मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयांतर्गत क्षेत्रिय कार्यालयाकरिता निवडणूक विषयक कामकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ नव्याने बाह्ययंत्रणेद्वारे घेण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

**शासन निर्णय क्रमांक : आस्था-२०२३/प्र.क्र.६४२/२३/निवडणूक**

**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : १६ एप्रिल, २०२६**

**संदर्भ :** वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक पदनि-२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क, दि.२७/०४/२०२२

**प्रस्तावना :-**

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयांतर्गत क्षेत्रिय कार्यालयांमध्ये निवडणूक विषयक संगणकीय व अन्य कामकाजासाठी मनुष्यबळ (कामाच्या स्वरुपानुसार डाटा एन्ट्री ऑपरेटर) बाह्ययंत्रणेद्वारे घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील क्षेत्रिय कार्यालयांमध्ये निवडणूक विषयक संगणकीय व अन्य कामकाजासाठी, कामाच्या स्वरुपानुसार ४९९ डाटा एन्ट्री ऑपरेटरच्या सेवा दि.०१/०१/२०२६ ते दि.३१/१२/२०२६ या कालावधीकरिता बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. जिल्हानिहाय तपशिल सोबतच्या परिशिष्टामध्ये दर्शविलेला आहे.

२. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी उपलब्ध डाटा एन्ट्री ऑपरेटरचे वाटप कामाच्या स्वरुपानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात व त्यांच्या अधिनस्त सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये करावे.

३. बाह्ययंत्रणेद्वारे डाटा एन्ट्री ऑपरेटरच्या सेवा उपलब्ध करुन घेतेवेळी वित्त विभागाच्या शासन निर्णय, क्रमांक पदनि-२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क. दि.२७ एप्रिल २०२२ अन्वये व त्यानंतर याबाबत वित्त विभागाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

(अ) बाह्ययंत्रणेद्वारे डाटा एन्ट्री ऑपरेटरच्या सेवा घेताना शासनाने विहीत केलेले नियम व कार्यपध्दती यांचे अनुपालन करणे आवश्यक आहे.

(आ) बाह्ययंत्रणेद्वारे कामे करुन घेण्यासाठी संबंधीत जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी ज्या बाह्य सेवा पुरवठादार संस्थेकडे काम सोपवावयाचे आहे, त्यांच्यासोबत त्याबाबतचा करार करावा. सदर करारात आवश्यकतेनुसार अटी व शर्ती नमूद कराव्यात. या करारामध्ये संबंधीत बाह्य सेवा पुरवठादार संस्थेमार्फत काम करणाऱ्या डाटा एन्ट्री ऑपरेटरच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(इ) सदर डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना भविष्यात कोणत्याही प्रकारे शासनाच्या अथवा जिल्हाधिकाऱ्यांच्या आस्थापनेवर नियुक्ती मिळणार नाही किंवा ते या आस्थापनांवर हक्क प्रस्थापित करु शकणार नाहीत, याची पूर्वकल्पना संबंधीत बाह्य सेवा पुरवठादार संस्थेस व कर्मचाऱ्यांस लेखी स्वरुपात देण्यात यावी व सदर बाबीस संबंधीत बाह्य सेवा पुरवठादार संस्था व संबंधीत कर्मचाऱ्यांची लेखी संमती घेण्यात यावी.

(ई) बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करुन घेण्यात आलेले डाटा एन्ट्री ऑपरेटर हे संबंधीत बाह्य सेवा पुरवठादार संस्थेचेच कर्मचारी असतील. त्यामुळे करारामध्ये ठरलेला डाटा एन्ट्री ऑपरेटरच्या कामाकरिताचा मासिक मोबदला हा संबंधीत बाह्य सेवा पुरवठादार संस्थेसच अदा करण्यात यावा.

(उ) वित्त विभागाच्या दि. २७ एप्रिल २०२२ च्या शासन निर्णयातील निर्णय क्र. १ नुसार, बाह्ययंत्रणेकडून कामे करुन घेताना जर अशी कामे नियमित पदनिर्मिती करुन केली असता जितका खर्च आला असता, त्या खर्चाच्या कमीत कमी २० ते ३० टक्के इतकी बचत होईल, अशा रितीने करुन घेण्याची तरतूद आहे. सदर तरतूद विचारात घेऊन बाह्य सेवा पुरवठादार संस्थेसमवेत करार करताना डाटा एन्ट्री ऑपरेटरचा मोबदला, बाह्य सेवा पुरवठादार संस्थेचा (कंत्राटदार / ठेकेदार / कंपनी / संस्था) प्रशासकीय खर्च व नफा आणि वस्तु व सेवा कर अशी एकत्रित देय रक्कम विहीत मर्यादेत राहील, याची कटाक्षाने दक्षता घेण्यात यावी.

४. यासाठी होणारा खर्च मुख्य लेखाशीर्ष २०१५- निवडणूका, १०३-मतदार याद्या तयार करणे व त्यांचे मुद्रण (००)(०१) मतदार यादी तयार करणे व त्यांचे मुद्रण (अनिवार्य), १०-कंत्राटी सेवा या उद्दीष्टाखालील संबंधीत आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय उपसमितीने दिलेली मान्यता व वित्त विभागाच्या सहतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९१/आपुक, दि.०८/०४/२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**६.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४१६१३३१५२७८०७ आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SUNIL SURESH SONAR

Digitally signed by SUNIL SURESH SONAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=65c5686107ad17321b26a7dcc66d1098655693c28b750301d0e92220965b0095, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=9943B9C43B20EF0EDC259749498600709E128347F867F9400CA5678C69418E81, cn=SUNIL SURESH SONAR
Date: 2026.04.16 13:32:54 +05'30'

**(सुनील सोनार)**
**अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, उप मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा.विधानसभा सदस्य / मा. विधान परिषद सदस्य, विधानभवन, मुंबई
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
७. प्रधान सचिव, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८. निवड नस्ती/निवडणूक-२ शाखा साप्रवि

शासन निर्णय क्रमांक आस्था-२०२३/प्र.क्र.६४२/निवडणूक-३३, दि.१६/०४/२०२६ सोबतचे विवरणपत्र

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | तालुक्यांची संख्या | सन २०१३ मध्ये मंजूर करण्यात मनुष्यबळ | सन २०२४-२५ मध्ये नव्याने निर्मिती केलेले वाढीव मनुष्यबळ | एकूण मंजूर मनुष्यबळ (रकाना क्र.४+५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | नंदुरबार | ६ | ६ | ० | ६ |
| २ | धुळे | ४ | ५ | ३ | ८ |
| ३ | जळगांव | १५ | १६ | ० | १६ |
| ४ | नाशिक | १५ | १९ | ० | १९ |
| ५ | अहमदनगर | १४ | १४ | ० | १४ |
| ६ | बुलढाणा | १३ | १३ | ० | १३ |
| ७ | यवतमाळ | १६ | १६ | ० | १६ |
| ८ | अकोला | ७ | ७ | २ | ९ |
| ९ | वाशिम | ६ | ६ | ० | ६ |
| १० | अमरावती | १४ | १५ | ० | १५ |
| ११ | वर्धा | ८ | ८ | ० | ८ |
| १२ | नागपूर | १४ | १९ | ० | १९ |
| १३ | भंडारा | ७ | ७ | ० | ७ |
| १४ | गोंदिया | ८ | ८ | ० | ८ |
| १५ | गडचिरोली | १२ | १२ | ० | १२ |
| १६ | चंद्रपूर | १५ | १५ | ० | १५ |
| १७ | नांदेड | १६ | १७ | ० | १७ |
| १८ | हिंगोली | ५ | ५ | ० | ५ |
| १९ | परभणी | ९ | ९ | ० | ९ |
| २० | जालना | ८ | ८ | ० | ८ |
| २१ | औरंगाबाद | ९ | ११ | ० | ११ |
| २२ | बीड | ११ | ११ | ० | ११ |
| २३ | लातूर | १० | १० | ० | १० |
| २४ | उस्मानाबाद | ८ | ८ | ० | ८ |
| २५ | ठाणे | ७ | २२ | २० | ४२ |
| २६ | मुंबई उपनगर | ३ | ३२ | ० | ३२ |
| २७ | मुंबई शहर | ० | १३ | ० | १३ |
| २८ | रायगड | १५ | १५ | ० | १५ |
| २९ | रत्नागिरी | ९ | ९ | ० | ९ |
| ३० | सिंधुदुर्ग | ८ | ८ | ० | ८ |
| ३१ | पुणे | १४ | २८ | १७ | ४५ |
| ३२ | सोलापूर | ११ | १२ | ७ | १९ |
| ३३ | सातारा | ११ | ११ | ० | ११ |
| ३४ | कोल्हापूर | १२ | १३ | ० | १३ |
| ३५ | सांगली | १० | १२ | ० | १२ |
| ३६ | पालघर | ८ | १० | ० | १० |
| | **एकूण** | **३५८** | **४५०** | **४९** | **४९९** |